शैक्षणिक संदर्भ अंक १२५ ऑगस्ट-सप्टेंबर २०२०

गोष्ट सांगण्याचं कसब

लेखक - कृष्णकुमार अनुवाद- फारूक काझी

गोष्ट सांगण्याचं कसब

लेखक - कृष्णकुमार   अनुवाद- फारूक काझी

मुलांना गोष्ट सांगायला खरंच मोठं कसब लागतं. गोष्ट सांगताना कोणकोणत्या बारकाव्यांचा विचार करायला हवा? गोष्ट सांगण्याचे काय उपयोग होतात?

आपल्याकडे प्राथमिक शाळेतील पहिल्या दोन इयत्तांमध्ये गोष्ट सांगण्यासाठी म्हणून एखादी खास तासिका नसते, ही अत्यंत खेदाची बाब आहे. गोष्टींमुळे मुलांना शाळेत टिकवून आणि रमवून ठेवण्याची समस्या बऱ्याच अंशी दूर झाली असती. काही लोकांना वाटेल 'शाळेतून गळती' ह्या समस्येचं गांभीर्य मला अजिबात कळत नाहीये. माझा सल्ला ऐकून अधिकारी उपहासाने हसतीलही. पण आज त्यांच्या दांडग्या अनुभवाने आणि प्रशासकीय ज्ञानाने ही गोष्ट त्यांच्या डोक्यातून हद्दपार केली असली तरी त्यांनाही कधीकाळी याची जाणीव असेल की 'गोष्ट सांगण्याचा मुलांवर जादुई प्रभाव पडतो'.

शिक्षक प्रशिक्षण संस्थासुद्धा गोष्ट सांगण्याला फारसं महत्त्व देताना दिसत नाहीत. त्यांनी तयार केलेल्या पाठ्यक्रमात मात्र गोष्ट सांगण्याचं महत्त्व पटवून दिलेलं असतं. ही एक शोकांतिका आहे.

खरं तर लहान मुलांना शिकवणाऱ्या प्रत्येक शिक्षकाकडून (शिक्षक-शिक्षिका) कमीत कमी एवढी अपेक्षा केली जायला हवी की त्यांना किमान तीस पारंपरिक गोष्टी पाठ असायला

हव्यात आणि त्या त्यांना आत्मीयतेने आणि आत्मविश्वासाने सांगता यायला हव्यात. ज्या



समाजाला हजारो गोष्टींचा वारसा लाभलेला आहे त्या समाजासाठी ही काही कठीण गोष्ट नाही. तीस अशा गोष्टी, ज्या शिक्षक त्यांच्या मर्जीने कधीही सांगू शकतील. अशा कथा प्राथमिक स्तरावरील पहिल्या दोन वर्गांचं वातावरणच बदलून टाकतील. इथं अट एकच, दैनंदिन अध्यापनात गोष्ट सांगण्याला एक सन्मानाचं स्थान दिलं जायला हवं. कारण गोष्ट सांगणं ही आत्यंतिक महत्त्वाची गोष्ट आहे.

कुठून आणायच्या गोष्टी?

मी पारंपरिक गोष्टी सांगण्याचा आग्रह धरलेला आहे. तरुण शिक्षकांना गोष्टी सांगण्याचं प्रशिक्षण देतानाचा माझा अनुभव असा आहे की त्यांना मुलांना ऐकवण्यालायक गोष्टी शोधायला सांगितल्या तर ते कुठल्यातरी मासिकातील गोष्टी घेऊन येतात. त्यातील काही लोक कॉमिक्स शोधून आणतात तर काही दीर्घ विनोद किंवा सत्य घटनेवरील वृत्तांत पाठ करून येतात. अशा प्रकारचं साहित्य 'गोष्ट' म्हणून स्वीकारायला काहीच हरकत नाही. परंतु प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या सहा किंवा सात वर्षांच्या मुलांवर अशा कथा जादुई प्रभाव पाडतील अशी अपेक्षा ठेवणं चूक ठरेल.

परंपरेने आलेल्या कथांमध्ये अशी काही वैशिष्ट्ये असतात जी वर्तमानकालीन विविध रूपातील आणि माध्यमातील कथांमध्ये पाहायला मिळत नाहीत. अशा वैशिष्ट्यांची चर्चा करण्याआधी मी पारंपरिक कथांच्या स्रोतांचा उल्लेख करू इच्छितो. सर्वांत आधी पंचतंत्र, जातककथा, महाभारत, अरेबियन नाईट्स, विक्रमादित्याच्या कथा आणि विविध भागातील लोककथा या सहज आणि समृद्ध स्रोतांच्या श्रेणीत मोडतात. त्यानंतर कथा सरितसागर

आणि जगभरातील लोककथांचा क्रमांक लागतो. हे स्त्रोत सहज उपलब्ध होत नाहीत. पाठ्यक्रमात गोष्ट सांगण्यासाठी विशिष्ट स्थान देऊ पाहणाऱ्यांना अशा स्त्रोतांतून निवडक कथांचा एक संग्रह तयार करावा लागेल.

सांगण्यायोग्य गोष्टी

एखाद्या चांगल्या गोष्टीची वैशिष्ट्ये पडताळून पहायची असतील तर, पिढ्यानपिढ्या मुलं आनंदाने जी गोष्ट ऐकत आली आहेत अशी गोष्ट निवडावी लागेल. याचं उत्तम उदाहरण म्हणजे पंचतंत्रातील ससा आणि सिंहाची गोष्ट. या गोष्टीचं कथानक जसं दिसतंय तितकं ते सहज सोपं मुळीच नाही. आपण या कथेतील मुख्य प्रसंगांची तपशिलात चर्चा करूया.

गोष्टीत एके दिवशी सशाला सिंहासमोर हजर व्हायचं असतं. सशाला आधीच एवढा उशीर झालेला असतो की सिंह भुकेनं अगदी वेडावून गेलेला असतो. या क्षणी सिंहाशी कसलीही वाटाघाटी करणं एकदम अशक्य होतं. परंतु तरीही ससा सिंहासमोर आपली बाजू मांडतो. वाटेत त्याला दुसऱ्या एका सिंहाने अडवल्यामुळे...ही वार्ता एकदम खोटी असते, मात्र रागावलेल्या सिंहाच्या डोक्यात ती पक्की बसते. त्याला पहिल्यांदा आपल्या प्रतिस्पर्ध्याचा निकाल लावावासा वाटतो. म्हणून तो सशाबरोबर त्या विहिरीकडे चालू लागतो जिथं सशाला त्या दुसऱ्या सिंहाने अडवलेले होते. या दुसऱ्या निर्णायक क्षणी ससा आपला धूर्तपणा, सिंहाच्या मनात त्यानेच निर्माण केलेला राग आणि ईर्षा यावर विश्वास ठेवून पुढे होतो.



विहिरीत आपलं प्रतिबिंब पाहून सिंहाचं भान सुटतं आणि पाण्यात पडून तो मरून जातो.

आपण या गोष्टीकडे थोडं बारकाईने पाहूया.

पहिली महत्त्वाची बाब म्हणजे या गोष्टीत कुठेही उपदेश नाही. उलट ही गोष्ट सरळ सरळ गंभीर प्रश्नांना भिडते- उदा. एखाद्या पाशवी ताकदीपासून किंवा साक्षात मृत्यूपासून स्वत:ची सुटका कशी करून घ्यावी. साधारणपणे आपण मुलांशी गप्पा मारताना असे प्रश्न निर्माणच होऊ देत नाही. मुलांना अशा प्रश्नांत प्रचंड स्वारस्य असतं हे अगदी उघड सत्य आहे. हे स्वारस्य का निर्माण होत असावं बरं?

या प्रश्नाच्या चर्चेआधी मी या कथेतील आणखी एका वैशिष्ट्याकडे आपलं लक्ष वेधू इच्छितो. ही कथा एका लहान प्राण्याची कथा आहे, तो एका मोठ्या प्राण्याशी झुंजतो आहे. त्या संकटावर मात करण्यासाठी तो छोटा प्राणी जी काही शक्कल लढवतो तिला सर्वसाधारणपणे आपण अनैतिक समजतो.

संकटावर मात करताना ससा आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या काही उत्तम गुणांची झलक दाखवतो. त्यात साहस, संकटात आत्मविश्वास, कोणत्याही कठीण प्रसंगात आपलं डोकं शांत ठेवण्याची ताकद आणि आपल्यापेक्षा वयाने व ताकदीने मोठ्या असणाऱ्याशी योग्य वर्तन यांचा समावेश होतो.

आपणाला याकडेही लक्ष द्यावं लागेल की कथा किती वेगात पुढं सरकते.

सुरवातीलाच एक विचित्र नियम केला जातो की रोज एक प्राणी स्वेच्छेने वृद्ध राजाची शिकार बनेल. अशी दैनंदिन व्यवस्था ठरवल्यावर लवकरच छोट्या सशाची पाळी येते आणि कथेचा मुख्य भाग समोर येतो. इतर घटना खूप वेगात घडतात. कारण स्वत:ला वाचवण्यासाठी खतरनाक योजना आखून ससा एक क्षणही दवडत नाही. गोष्ट ऐकणारी व्यक्ती संवादांच्या माध्यमातून एकापाठोपाठ एक असे धक्के पचवत पुढे सरकत राहते.

वाचणाऱ्याला एकंदर परिस्थितीकडे सशाच्या नजरेने पाहण्यापलीकडे दुसरा पर्यायच नसतो. इतकं ही कथा खिळवून ठेवते.

ही कथा त्यांना असं एक पात्र म्हणजे हिरो देते, त्याच्याशी ते पूर्ण तादात्म्य पावतात. ते पात्र आहे सशाचं. मुलं आपल्या दैनंदिन जीवनात जशा अडचणींना सामोरी जात असतात, तशाच आव्हानांना ससा तोंड देत असतो. तो लहान आणि दुर्बल आहे, त्याला असं काम करायचं आहे- जे त्याला आवडणारं नाहीये, त्याला अशा एका प्राण्याकरवी मारले जाण्याची भीती आहे- ज्याच्याजवळ संपूर्ण सत्ता आणि शारीरिक ताकद आहे. लहान मुलंही आपल्या दैनंदिन जीवनात सशासारखाच अनुभव घेत असतात. आपण आई-वडील आणि शिक्षकाची भूमिका पार पाडण्यात इतके मश्गूल झालेले असतो की तिकडे आपलं लक्षच जात नाही. अचानक होणारा मृत्यू हे लहानपणी मुलांच्या भीतीचं मोठं कारण असू शकतं, याची कल्पना आपल्यापैकी फार थोड्या लोकांना असते. कुणा मोठ्या आणि ताकदवान व्यक्तीशी सामना करण्याची पुसटशी शंकाही अशाच प्रकारची भीती निर्माण करते.

गोष्ट सुरू होताच मुलांचं लक्ष वेधून घेते, कारण मुलं स्वत:ला त्यात कल्पू लागतात. त्यानंतर कथेत घडणाऱ्या घटनांमुळे त्यांच्या आकर्षणाला आणखी बळ मिळायला लागतं. लहान ससा एक योजना आखतो आणि ती सफलही होते. ती केवळ त्याच्यासाठीच नव्हे तर सर्वांसाठीच उपयोगी ठरते. तसेच त्यामुळे आलेली समस्या मुळातूनच नष्ट होते.

सशाच्या योजनेचं मुलांना आकर्षण वाटण्यामागे आणखी एक कारण आहे. मुलांच्या दैनंदिन जीवनातील अत्यंत निरागस इच्छा- बहाणा करण्याची इच्छा! उशिरा येण्याचा बहाणा करण्यात आणखी एक आकर्षण आहे. तो बहाणा केवळ स्वत:चा जीव वाचवण्यासाठी नव्हता तर सिंहाचा जीव घेण्यासाठीसुद्धा केला गेला होता. वास्तविक पाहता सशाची

अवस्था इतकी कठीण आहे की अन्याय करणाऱ्याला मारल्याशिवाय त्याचा जीव वाचूच शकणार नाही. अशा प्रकारे कथा संकटातून निसटण्याचं एक जबरदस्त नाट्य सादर करण्यासाठी, बहादुरीने केल्या गेलेल्या संहाराचा वापर करते.

यात जर कोणती नैतिकता असेल तर ती आत्मरक्षणाची. याची जाणीव आपल्याला तेंव्हाच होऊ शकते जेव्हा आपण या कथेकडे मुलांच्या दृष्टीने पाहू शकू. मोठ्यांच्या दृष्टीने पाहिले, तर ही कथा एक अनैतिक गोष्ट वाटू लागेल. आणि प्रत्यक्षात ती आहेही तशीच.

आता हे स्पष्ट झालंच असेल की एखादी चांगली गोष्ट ऐकण्याशी नैतिकता किंवा नैतिक शिक्षण यांचा अजिबात संबंध नसतो. कमीत कमी प्रत्यक्ष तरी नसतो.

या कथेकडे सखोल दृष्टीने पाहिलं तर जाणवतं की यात एक प्रेरक बाब आहे. त्यातून दिसतं की संकटकाळी डोकं शांत ठेवण्याचे काय फायदे होतात? गोष्ट हे दाखवते की विचारपूर्वक आणि कल्पकतेने काम करणं किती महत्त्वाचं आहे. परंतु याला पारंपारिक अर्थाने 'नैतिक शिक्षण' म्हणत नाहीत. खरं तर महान पारंपरिक गोष्टी या पारंपरिक अर्थाने कोणतंही नैतिक शिक्षण देत नाहीत. गोष्ट सांगण्याचा हेतू नैतिक शिक्षण देणं असत नाही. गोष्ट सांगण्याने होणारे फायदे खूप वेगळे आहेत. ते खालीलप्रमाणे-

१. श्रवण क्षमतेचा विकास

चांगला श्रोता कोण असतो? तोच जो शेवटपर्यंत ऐकत राहील. सगळ्यांसाठीच आपण हे नाही म्हणू शकत. औपचारिक चर्चेतही लोक इतरांना बोलू देत नाहीत. याचं कारण म्हणजे त्यांना जणू ठाऊकच असतं की समोरचा माणूस काय बोलणार आहे. दुसरं कारण म्हणजे त्यांची ऐकून घेण्याची तयारीच नसते. आता ऐकणं हे एक कौशल्य मात्र उरलेलं नाही. उलट ते आता एक रिवाज बनलं आहे. याला प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून उच्च स्तरावर

प्रशिक्षणं आयोजित केली जात आहेत. गोष्ट सांगण्याने एका निर्णायक काळात धीराने ऐकण्याची सवय लागते. पुढे हीच सवय जीवनाचा एक भाग बनून जाते.

आपणाला ऐकायलाही थोडं विचित्र वाटेल की आपल्यासारख्या समृद्ध मौखिक परंपरा असणाऱ्या देशातही चांगल्या श्रोत्यांची वानवा आहे. माझ्या मते याचा संबंध लहानपणी गोष्ट सांगण्याच्या केल्या गेलेल्या अवहेलनेशी आहे. मुलांना नियमितपणे गोष्ट सांगण्यासाठी वेळच नाही, असंच आधुनिक भारताला वाटू लागलंय. या उणिवेचे परिणाम आता स्पष्ट होऊ लागले आहेत.

२. अंदाज बांधण्याचं प्रशिक्षण

मुलांना आपल्या आवडीची गोष्ट वारंवार ऐकायची असते. एकदा का गोष्टीची ओळख झाली की त्या ओळखीचा उपयोग आपल्या ऐकण्याच्या वाढत्या क्षमतेचं परीक्षण करण्यासाठी करतात. हे परीक्षण नकळत घडत असतं. दुसऱ्या किंवा तिसऱ्या वेळी गोष्ट ऐकताना मुलं बरोबर अंदाज लावतात की पुढे काय होणार आहे आणि याचा त्यांना जास्त आनंद वाटत असतो. आपला अंदाज खरा ठरल्याने मिळणारा आनंद हा एका अनुभवी श्रोत्याला मिळालेलं बक्षीसच असतं. हा केवळ आनंद असतो का? तर नाही. गोष्टी ऐकणाऱ्या मुलांच्यात अंदाज बांधण्याच्या क्षमतेमुळे एक प्रकारचा विश्वास निर्माण होतो. हा विश्वास मुलांच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. विशेषतः वाचनक्षमता विकसनात. ही क्षमता शालेय जीवनातील पहिल्या दोन वर्षांतील सर्वांत मोठं आव्हान असते. साक्षरता आणि वाचनक्षमता यांच्या विकसनात अंदाज बांधण्याच्या क्षमतेच्या योगदानाची चर्चा मी माझ्या ‘बच्चों की भाषा और अध्यापक’ (मुलांची भाषा आणि शिक्षक) या पुस्तकात विस्ताराने केली आहे.

अंदाज लावण्याच्या क्षमतेचं योगदान इतरही विषयात पाहायला मिळतं, उदा. गणित आणि विज्ञान. गणितात नियमांचा उपयोग करून समस्या सोडवण्याला सैद्धांतिक महत्त्व आहे. गोष्टीतही नियम असतात. फरक इतकाच की ते रूपकांच्या स्वरूपात असतात. उदाहरणार्थ अनेक गोष्टी या नियमाचं पालन करतात की छोटे प्राणी मोठ्यांना फसवून विजयी होतात. ससा आणि सिंहाच्या गोष्टीत हेच घडतं. गोष्ट ऐकता ऐकता मुलांना हे नियम आकळायला लागतात. हे आकळणं अंदाज बांधण्याच्या क्षमतेला वृद्धिंगत करत असतं.

३. आपलं जग मोठं होतं

इथं मी आपल्या मन आणि डोक्यातील जगाविषयी बोलतोय. गोष्टीतून आपण आजवर कधीही न अनुभवलेल्या व्यक्ती, प्रसंगांना अनुभवत असतो.

प्रश्न हा आहे की अशा व्यक्ती आणि प्रसंगांना अनुभवण्याचा उपयोग काय? तर तेही



आपल्या जगण्याचाच एक भाग असतात. भले आपण त्यांना प्रत्यक्षात ओळखत नसू, परंतु मानसिक स्तरावर त्या आपणास त्रस्त करत असतात. खास करून लहानपणी. सामान्यत: आयुष्यभर ही त्रस्तता सोबतच राहते. उदाहरणच घ्यायचं झालं तर, आसपास कुणी वाईट माणूस नसला तरीही मुलं वाईट लोकांविषयी सतत विचार करत असतात. तसंच त्यांच्या मनात कुठेतरी चांगल्या, हुशार आणि प्रेमळ माणसाला भेटण्याची इच्छाही लपलेली असते. आदर्श कल्पनांचं रंजन आणि भयंकर संकटाची भीती ह्या गोष्टी बालमानसशास्त्रात पाहायला मिळतात. पारंपरिक गोष्टी या मनोविज्ञानाला प्रत्यक्षात आणतात आणि म्हणूनच मुलांना

स्वत:कडे खेचून घेतात. अजून साक्षर न झालेली लहान मुलं गोष्टी ऐकल्यानंतर स्वत:च्या अनुभवातल्या जगापेक्षा मोठ्या जगाची कल्पना करू लागतात. त्याचा अनुभव घेतात.

दुसरा मुद्दा असाही आहे की गोष्टींतून मिळणारे अनुभव असंबद्ध नसतात. उलट हे अनुभव आपल्या विस्कळीत जगाला एका सुसंबद्ध समाधानकारक क्रमबद्धतेत विणतात. ही वीण तसं पाहता ‘नैतिक’च असते. पण सर्वसामान्य अर्थाने नव्हे. दुर्बलाचा विजय होतोच, परंतु कित्येकदा चुकीच्या मार्गाचा अवलंब करून. उपाशी सिंहाशी सशाचं खोटं बोलणं हे त्याचंच एक उदाहरण.

गोष्ट ऐकणं आणि वाचून दाखवणं

शेवटी, गोष्ट सांगण्याचं महत्त्व आपल्याला मुलांच्या भाषिक साधनांच्या विस्तारात पाहायला मिळतं. शब्द ही अत्यंत वैयक्तिक संपत्ती आहे. ते आपल्याला वैयक्तिक पातळीवर जगातील विविध वस्तूंना वेगवेगळी नावं देण्याची क्षमता बहाल करतात. परंतु त्याचवेळी शब्द ही एक अशी सामाजिक संपत्तीही आहे की जिच्याद्वारे आपण अभिव्यक्त होत असतो. शब्दांची ही व्दि-मार्गी प्रकृतीच त्यांना अर्थपूर्ण बनवत असते. उदाहरणच घ्यायचं तर गोष्ट ऐकताना मुलं वैयक्तिक अनुभवाच्या बळावर उपाशी सिंहाची अवस्था समजून घेतात. गोष्ट मुलांना ‘भूक’ या शब्दाच्या अर्थाची व्याप्ती वाढवायला मदत करते. त्या व्याप्त अर्थात सिंहाची भूकही सामील होते. मुलं जितक्या जास्त गोष्टी ऐकतील तितकं त्यांच्या शब्दसंग्रहात इतरांच्या अनुभवार्थांना समाविष्ट करण्याचं सामर्थ्य येत जाईल. अशाप्रकारे लहानपणी ऐकलेल्या गोष्टी पुढं जाऊन वाचनक्षमतेचा आधार ठरतात.

वास्तविक पाहता गोष्टी सांगण्याच्या संदर्भात वर चर्चा केले गेलेले चारही मुद्दे, गोष्ट वाचण्यालाही लागू पडतात. वाचनक्षमता मुलांची ओळख भाषा-नियमांशी आणि तिच्या

संरचनेशी करून देत असते. चांगलं वाचन हे चतुराईने अंदाज बांधण्याच्या क्षमतेवर अवलंबून असतं. भाषा-नियमांची ओळख झालेली मुलं कथनात किंवा वाक्यात पुढे काय होणार याचा अंदाज बांधायला लागतात. या दृष्टिकोनातून गोष्ट सांगणं हे मुलांना साक्षर करण्यासाठी उपयोगीच ठरतं.

_गोष्टींचा-कोश_

कित्येक शिक्षकांना मुलांना ऐकवण्यायोग्य कथांची उणीव भासत असते. कधी कधी ते वर्तमानपत्रातील किंवा मासिकातील गोष्टींसदृश्य काहीतरी घेऊन येतात आणि मुलांना ऐकवतात. पन्नास-साठ कथांचा वैयक्तिक कोश तयार करून त्या पाठ करणं फारसं कठीण नाही. असा कोश तयार करण्यासाठी खालील स्त्रोतांचा उपयोग करता येऊ शकतो.

१. पंचतंत्र, कथासरित्सागर, जातक, महाभारत, वेताळ-पंचविशी, सिंहासन-बत्तीशी, पुराणातील कथा.
२. देशातील आणि जगभरातील लोककथांचा संग्रह.
३. आपल्या भागातील लोककथांचा संग्रह गावातील वयस्कर व्यक्तींच्या मदतीने.
४. ऐतिहासिक कथा.
५. स्थानिक घटना ज्यांची गोष्ट बनू शकेल.

मूळ लेख- बच्चे की भाषा और अध्यापक, कृष्णकुमार. एनबीटी प्रकाशन, नवी दिल्ली.

शैक्षणिक संदर्भ (हिंदी), अंक ४८ मधून साभार.

§§§

लेखक: **कृष्णकुमार,** प्रसिद्ध शिक्षणतज्ञ आणि लेखक

अनुवाद: **फारूक काझी**, प्रयोगशील शिक्षक व कथाकार, लॉकडाऊनच्या काळात तीस ते पस्तीस कथा ऑडिओ, विडियो स्वरूपात वाचकांपर्यंत पोहोचल्या आहेत.

इमेल: farukskazi82@gmail.com

(कळीचे शब्द: गोष्ट, अध्यापनात गोष्टींचे महत्त्व, पारंपारिक गोष्टी, गोष्टी सांगण्याचे फायदे, गोष्टींचा कोश)